सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
॥ यः क्रियावान् स पण्डितः ॥

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
## क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ
आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११००७
दूरध्वनी क्र. ०२०-२५६०११४३, २५६०११४२, टेलिफॅक्स ०२०-२५६९७५११

FIT INDIA

संदर्भ : विक्रीमं/३/७२५९ दिनांक : ०६ फेब्रुवारी, २०२४

**प्रति,**
**मा. प्राचार्य / मा. संचालक,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न असलेली**
**पुणे शहर व पुणे जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था**

**विषय : "लोणी मॅरेथॉन २०२४" बाबत...**

महोदय / महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अमृत महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. या अमृत महोत्सवाचे औचित्य साधत "माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी लोणी", ता. आंबेगाव, जि . पुणे येथील सर्व माजी विद्यार्थ्यांनी दि. ११ फेब्रुवारी, २०२४ रोजी **"लोणी मॅरेथॉन २०२४"** चे आयोजन केले आहे. सोबत माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी लोणी यांचे पत्र माहितीस्तव जोडले आहे.

याद्वारे आपणांस विनंती की, वरील उपक्रमाबाबत आपण आपल्या महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त संस्थेतील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सेवक व सर्व घटकांना ज्ञात करावे व सदर उपक्रमात सहभाग घेण्यास प्रोत्साहीत करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

Savitribai Phule Pune University SPORTS Pune-7.

**डॉ. विष्णू पेठकर**
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

# माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी, लोणी

मु. पो. लोणी (धामणी), ता. आंबेगांव जि. पुणे -४१० ५१०.
रजि. नं. : महा/११२६/२०१७ ● एफ ४९८१७/पी ● Pan Card No : AAFTM4669N
Income Tax Exemption : 80G : ITBA/EXM/S/80G/2020-21/1029670914(1) / 12 AA/2019-20/A/10601

कार्यालय : ५०६, केतकी अपार्टमेंट, तिसरा मजला, अलका टॉकीजशेजारी, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०
Mobile : 9763839080, 8007121999 Email : mvvp.loni@gmail.com

जावक क्र. : MVVP/2024/11 — दिनांक : 18 - 01 - 2024

839
05-02-2024
06-02-2024
BSD / Sports

प्रति,
**प्रा. डॉ. विजय खरे**
प्रभारी कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**विषय :** दिनांक ११ फेब्रुवारी २०२४ रोजी **"लोणी मॅरेथॉन २०२४"** आयोजित करण्याबाबत ....

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अमृत महोत्सवी वर्ष साजरे करत आहे, तसेच दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यापीठाचा स्थापना दिवस आहे. या अमृत महोत्सवाचे औचित्य साधत **"माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी लोणी,"** ता. आंबेगाव, जि. पुणे येथील सर्व माजी विद्यार्थी दिनांक **११ फेब्रुवारी २०२४** रोजी **"लोणी मॅरेथॉन २०२४"** आयोजित करत आहेत. सोबत पत्रक जोडत आहोत.

विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच नागरिक यांच्यामध्ये आरोग्याबाबत जनजागृती हा एकमेव उद्देश ठेवून सदर मेरेथॉनचे आयोजन होत आहे. लोणी मॅरेथॉन २०२४ मध्ये सहभागी धावपटूस टी-शर्ट, मेडल्स आदी बक्षिसांसोबतच रोख रक्कमेची पारितोषिकांचे वितरण केले जाणार आहे. मॅरेथॉन ०३ कि. मी. , ०५ कि. मी. , १० कि. मी. , २१ कि. मी. अश्या विविध टप्प्यात संपन्न होत आहे.

तरी, ह्या विनंती पत्राद्वारे आम्ही **माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी लोणी** आपणास विनंती करत आहोत की, सदर **लोणी मॅरेथॉन २०२४** मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांतील विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच इच्छुक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभागी व्हावे ह्याबाबत आपल्या कार्यालयामार्फत आवाहन करण्यात यावे व सदर मॅरेथॉन बाबतची माहिती विद्यापीठ संकेत स्थळावरून देवून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा स्थापना दिवस व अमृत महोत्सवी वर्ष उत्साहात साजरे करण्यासाठी सहकार्य करावे.

आपले विनीत,

**माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी, लोणी**

| | | |
|---|---|---|
| **श्री. उदयसिंह वाळुंज** | **डॉ. अविनाश वाळुंज** | **श्री भाऊसाहेब गायकवाड** |
| **अध्यक्ष** (मो. 9422003021) | **सचिव** (मो. 9763839080) | **खजिनदार** (मो. 80071219990) |

Dir-BSD / Dir-sports

06/02/2024